## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०२/२०१७

**१) घराच्या समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सोन्या चांदीचे व एटीएम मधुन पैसे काढल्याचे मॅसेज समजल्या वरुन गुन्हा नोंद . :–**

दिनांक १९ /०२/२०१७ चे ०८.०० ते २५/२०/२०१७ चे १३.०४ वा. दरम्यान यातील फिर्यादी लवकुश चंद्रीकाप्रकाश पांडे वय ३८ वर्ष, रा. मुरमाडी हे आपल्या स्व:गावी बबनबव्हा (युपी) येथे दिनांक १९/०२/२०१७ रोजी घराला कुलुप लावुन गेले असता दिनांक २५/०२/२०१७ ला दुपारी १३.०० वा. दरम्यान त्याचे मोबाईवर एटीएम वरुन पैसे काढल्याचा मॅसेज आल्याने व ते एटीएम कार्ड लाखनी येथे घरी असल्याने फिर्यादीने त्याचे शेजारील अक्षय मुटकुरे यांना फोन करुन घरी जावुन पाहण्यास सांगीतले असता चोरी झाल्याचे समजले यावरुन दिनांक २७/०२/२०१७ चे १६.०० वा. फिर्यादी गावावरुन परत येवुन घराची पाहणी केली असता सॅनसुई कंपनीची एलईडी टिव्ही, फिलीप्स कंपनीचा होम थेटर, एचपी कंपनीचा लॅपटॉप, कॅनल कंपनीचा कॅमेरा, महाराष्ट्र व एसबीआय बॅकेचे एटीएम, चांदीचे सात सीक्के, सोन्याचे टॉप्स ०४ ग्रॅम, १ डायरी ज्यात एटीएम पासवर्ड व अकाऊंट नंबर लिहलेली असा एकुण ३३,५००/–रु. चा माल व एटीएम मधुन विड्राल केलेले २२,९००/–रु. असा एकुण ५६,४००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. सहकलम ६६ (ड) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पोस्टे लाखनी हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी. :–**

दिनांक २६/०२/२०१७ चे २१.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी गोवींद श्यामराव चामलाटे वय ३० वर्ष, रा. घटेगाव त. सडक अर्जुनी याचा साळा जखमी उमेश सुधाकर राऊत वय २७ वर्ष, रा. वडेगाव हा एनएच ०६ रोडाने सौंदड वरुन वडेगाव कडे त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई ९०३३ पॅशन प्रो कंपनीचे मोटार सायकलने येतांना त्याचे मागेहून येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवाहीने चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक दिल्याने तो रोडवर पडला त्यात त्याचे डोक्याला व कमरेला गुप्त मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व आरोपी वाहन चालक समोर विरसी फाटयावर गाडी थांबवुन पडून गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पोस्टे साकोली हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ करुन पावशीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक २०/०२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचे पत्नीस शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने 'शिवीगाळ का करतोस म्हणुन बोलला असता' यातील आरोपीने बिलाचे पैसे माझ्याकडे दे असे बोलला असतांना फिर्यादी याने ईलेक्ट्रीक बिलाचे पैसे मीच भरतो असे बोलुन आरोपीने भांडण करुन लोखंडी पावशीचे उलटया बाजुने फिर्यादीचे उजव्या हाताचे अंगठया जवळ मारुन जखमी केल्याने व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी घनश्याम धनपत भुरे वय ३६ वर्ष, रा. कचरखेडा यांचे तोंडी व डॉ. परीक्षण व एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२५,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोस्टे कारधा हे करीत आहेत

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक २८/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, तुमसर व सिकोली येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २० लिटर हातभटटी दारु किंमती १३००/–रु. व देशी दारु १ लिटर ८० मिली लिटर किंमती ३००/–रु. तसेच जुगारातुन किंमती १६५ /–रु. असा एकुण किंमती १,७६५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.